ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख २९ फेब्रुवारी, १९५६ | अंक ९

## विविध माहिती

**सौराष्ट्रामधील विजेचा पुरवठा**—सौराष्ट्र सरकारनें राज्यांतील दूरदूरच्या गांवांना व शहरांना विजेचा पुरवठा करण्याची योजना सौराष्ट्र-वीज-बोर्डातर्फे तयार केली आहे. ही योजना अंमलांत आणण्यासाठी राज्यसरकारनें सुमारें १॥ कोटी रुपयांचें कर्ज उभारण्याचा विचार चालविला आहे असें समजतें.

**आंध्र राज्यांतील विकास-योजना**—आंध्र राज्यांतील विकास योजनांना लागणारा पैसा मिळविण्यासाठी राज्य सरकार ६ कोटी रुपयांचें कर्ज काढणार आहे, अशी माहिती मुख्य मंत्री श्री. गोपाल रेड्डी ह्यांनीं जाहीर केली. त्याशिवाय, योजनांच्या खर्चासाठी मध्यवर्ति सरकारकडून १५ कोटी रुपयांची मदत मिळविण्याची खटपटहि चालू आहे.

**ब्रिटनचा संरक्षणावरील खर्च**—१९५६-५७च्या आर्थिक वर्षांत ब्रिटनचें सरकार संरक्षण खात्यावर सुमारें १५,४८,००० हजार पौंड खर्च करील असें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. चालू आर्थिक वर्षापेक्षा हा खर्च ११,५०० हजार पौंडांनीं अधिक आहे.

**आरे गौळवाड्यांसाठी यंत्र**—न्यूझीलंडमधील एक तज्ज्ञ डॉक्टर व्हिटल स्टोन हे आरे येथील गौळवाड्याची पहाणी करण्यासाठी आले आहेत. गौळवाड्यांतील गुरांच्या धारा काढण्यासाठी न्यूझीलंडमध्यें बनविलेलें एक विशेष यंत्र त्यांनीं आणलें असून त्याचा कितपत उपयोग होतो तें पहाण्याचा त्यांचा विचार आहे. ते भारतांत ६ आठवडे राहणार आहेत.

**हुबळी येथील कापडाची गिरणी**—हुबळी येथील भारत स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल पुन्हां चालू करण्याचे प्रयत्न स्थानिक उद्योगपतींनीं चालविले आहेत. ही गिरणी एक वर्षापासून बंद असून तिचा कारभार बंद करण्याची कायदेशीर तरतूद चालू आहे. गिरणी बंद झाल्यामुळें ३,५०० कामगार बेकार झाले आहेत.

**सांस्कृतिक शिष्यवृत्त्या**—तरुण कलाकारांना उत्तेजन देऊन कला व संस्कृति ह्यांचा विकास करण्यासाठी चालू सालीं भारतीय सरकारनें २८ सांस्कृतिक शिष्यवृत्त्या देण्याचें ठरविलें आहे. देशांत कला व सांस्कृतिक कार्याचा अधिक प्रसार व्हावा म्हणून हा उपक्रम सुरू करण्यांत आला आहे.

**ब्रह्मदेशाची भारतांत खरेदी**—भारतांत माल खरेदी करण्यासाठी ब्रह्मदेशाच्या अर्थखात्याच्या मंत्र्यांच्या नेतृत्वाखालीं एक व्यापारी मंडळ भारतांत आलें होतें. मंडळानें भारताच्या निरनिराळ्या भागांत १५ दिवस दौरा केला आणि सुमारें ३॥ कोटी रुपयांची मागणी नोंदविली.

**रशिआजवळ लांब पल्ल्याचें रॉकेट**— अमेरिकेच्या नागरी राष्ट्रीय संरक्षण-संघटनेचे सभासद मि. हैन्स ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, रशिआनें प्रचंड स्फोटक शक्तीचें लांब पल्ल्याचें रॉकेट तयार करण्यांत यश मिळविलें आहे. ह्या अस्त्राच्या साह्यानें बोस्टनसारख्या मोठ्या शहरांजवळील ५० मैलांचा टापू उध्वस्त होईल आणि तें अस्त्र सोडल्यापासून ३० मिनिटांत शहरावर येऊन आदळेल, असाहि इषारा त्यांनीं दिला.

**वृत्तपत्रांच्या कागदाची आयात**— १९५५ सालच्या पहिल्या दहा महिन्यांत भारतानें परदेशांतून वृत्तपत्रांना लागणारा ३८,२७९ टन कागद आयात केला. ह्याच वर्षांत भारतामधील कागदाच्या कारखान्यांनीं २,३७४ टन कागदाचें उत्पादन केलें. कागदाच्या निर्मितीसाठीं लागणारा बहुतेक सर्व कच्चा माल देशांतीलच वापरण्यांत आला होता.

**रशिआची छोटी मोटारगाडी**— रशिआनें अगदीं छोटी मोटारगाडी बांधली असून तिला 'खार' असें नांव दिलें आहे. ह्या मोटारी तयार करण्याचा कारखाना उरल पर्वतांत आहे. गाडीचें एंजिन मागल्या बाजूला असून तींत पांच माणसें बसूं शकतात. गाडीची जास्तींत जास्त गति तासाला ६० मैलांची आहे. एक गॅलन पेट्रोलवर ती ५० मैल जाऊं शकते.

**दंतविषयक गिब्स शिष्यवृत्ति**— मुंबईच्या युनायटेड ट्रेडर्स लिमिटेड ह्या कंपनीनें दंतविषयक गिब्ज शिष्यवृत्ति सालाबादप्रमाणें यंदाहि जाहीर केली आहे. ही शिष्यवृत्ति १९५२ सालापासून देण्यांत येत असून तिची रक्कम ७,५०० रुपये आहे. हिरड्यांना होणाऱ्या रोगांचें संशोधन करण्यासाठी ती देण्यांत येत असते.

**सीलोनमध्यें अवर्षण**— सीलोनमध्यें अवर्षण झाल्यामुळें पाण्याचें दुर्भिक्ष जाणवत आहे. चहाचे व रबराचे मळे आणि नारळाचीं आगरें ह्यांना अवर्षण चांगलेंच जाणवत आहे. नारळाच्या आगरांत मजुरांना आठवड्यांतून तीनच दिवस काम मिळत आहे. रबराच्या व चहाच्या मळ्यांतील उत्पादन निम्म्यावर आलें आहे. असें अवर्षण गेल्या ३५ वर्षांत पडलें नव्हतें.

**सिलोनचें फिनॅन्स कार्पोरेशन**—सिलोनच्या सरकारनें खाजगी उद्योगधंद्यांना उत्तेजन देऊन त्याच्याकरवीं राष्ट्रीय हिताचीं कामें करवून घेण्यासाठी डेव्हलपमेंट फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन केलें आहे. कॉर्पोरेशननें प्रत्येकीं १०० रुपयांचा एक असे ८०,००० भाग विकावयास काढले आहेत. सरकारनें १·६ कोटी रुपयांचे भाग घेतले आहेत. ८ जणांचें संचालक मंडळ असून त्यांत दोन सरकारी प्रतिनिधी आहेत.

## लवाद दावे व मुदतीचा कायदा

(श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., वकील, पुणें.)

मुंबई सहकारी सोसायट्यांच्या १९२५ च्या कायद्यान्वयें कलम ५४ यांत उल्लेख केलेल्या लवाद दाव्यांना मुदतीचा कायदा लागू आहे किंवा कसें ह्याबाबत विचार करणेंचे ह्या लेखांत योजिलें आहे. सदरच्या कायद्याखालील कानू ३५ अन्वयें लवाद दाव्याचे कामीं न्यायदान करतांना न्याय करणाऱ्या अंमलदारानें म्हणजे न्यायाधीशानें न्याय्य व सद्सद्विवेकबुद्धि यांस अनुसरून दाव्यांचा निर्णय घ्यावा अशी तरतूद केलेली आहे. दिवाणी कोर्टांतील कज्जांचा निकाल करतांना कायदेशीर व तांत्रिक मुद्यांना विशेष महत्त्व प्राप्त होतें. कांहीं वेळां एकाद्या पक्षकाराची बाजू सत्य असूनहि त्याचा दावा कायद्याच्या चौकटींत न बसलेमुळें अथवा एकाद्या कायदेशीर अगर तांत्रिक मुद्याची अडचण असलेमुळें त्याच्या बाजूनें निकाल होत नाहीं. लवाद कोर्टांतील चालणाऱ्या लवाद दाव्यांचा निकाल न्यायाधीशास न्याय्य व सद्सद्विवेकबुद्धि यांस अनुसरूनच द्यावा लागतो. लवाद कोर्टांत दाखल केलेल्या दाव्यास मुदतीच्या कायद्याची हरकत आहे अगर विशिष्ट मुदतींत तो दाखल केलेला नसलेमुळें तो रद्द करणेंत यावा, अशा स्वरूपांच्या तक्रारींना फारसें महत्त्व राहात नाहीं. दिवाणी कोर्टांतील दावे योग्य त्या मुदतींत दाखल केलेले नसल्यास ते दावे मुदतीच्या कायद्यानुसार रद्द होतात; मग अशा प्रकारचे दावे खरे असोत अगर नसोत. दिवाणी दावा योग्य त्या मुदतींत दाखल झाला नसल्यास सुनावणीचे वेळीं सदरचा दावा मुदतींत आहे कां? अशा स्वरूपाचा मुद्दा आरंभींच उपस्थित केला जातो व ह्या मुद्याच्या निर्णयावर कित्येक वेळां पुढील चौकशी अवलंबून असते. लवाद कोर्टांतील न्यायदानाची पद्धत ज्या तत्त्वांवर आधारलेली आहे त्या तत्त्वांत तांत्रिक गोष्टींचा समावेश फारसा नाहीं. सरळ, सोपे, न्याय्य व सद्सद्विवेकबुद्धि यांच्या प्रेरणेनें जें योग्य दिसेल त्याप्रमाणें न्यायदान व्हावें हा सहकारी सोसायट्यांच्या कायद्यामागील हेतु स्पष्ट आहे; आणि म्हणून एकाद्या दाव्यास मुदतीच्या कायद्याची हरकत आहे किंवा एकादा महत्त्वाचा कागद नोंदलेला नाहीं अगर तो योग्य त्या स्टॅम्पावर नाहीं म्हणून तो कागद पुराव्याचे कामीं ग्राह्य मानतां येत नाहीं अशा स्वरूपाच्या तक्रारींना लवाद-कोर्टांत फारसें स्थान नाहीं; आणि म्हणून असें म्हटलें जातें कीं दावा मुदतींत नाहीं अशी तक्रार दाव्याचे कामीं करणें म्हणजे अप्रामाणिकपणा दर्शवणें होय. दिवाणी कोर्टांतील कज्जांचा निकाल त्या कायद्याखालील उपस्थित होणाऱ्या मुद्यांची चिकित्सा करून करावा लागतो आणि सहाजिकच कायदेशीर असे सर्व प्रश्न व उपप्रश्न विचारांत घेतले जातात. वरील विवेचनावरून एकाद्याचा असा समज होईल कीं, लवादकोर्टांतील दाव्यांना मुदतीच्या कायद्याची हरकत नाहीं म्हणजे अशा प्रकारचे दावे वाटेल तेवढ्या दीर्घ कालावधीनंतर लवाद कोर्टांत लावले तरी चालतील. परंतु असा समज धरून राहाणें चुकीचें होईल. दीर्घ कालावधीनंतर लावलेले लवाद दावे लवाद कोर्टांतहि टिकणार नाहीत. दाव्यास कारण घडल्यावर दावा दाखल करण्यांत वादीनें दिरंगाई केलेली असल्यास अगर दीर्घकाळ निष्काळजीपणा दाखवला असल्यास अशा दाव्याचे कामीं वादीचे मागणीप्रमाणें हुकुमनामा देणेचे अगोदर लवाद कोर्टास ह्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करावा लागेल व न्यायाधीशास वादीची अक्षम्य दिरंगाई अगर निष्काळजीपणा दिसल्यास त्यास सदरचा दावा रद्द करतां येईल. अशा स्वरूपाचे निकाल मुंबई राज्य सहकारी ट्रायब्युनलनें दिलेले आहेत.

X·Zm,N55
J6

162630


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
अ. मॅनेजर.

स्थापना सन १९३५ — टे. न. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० | |
| जमा भांडवल | रु. ९१,००० | |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,००० | हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० | ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० | ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. बा. बेंडे, श्री. झा. मा. मनसूख.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# अर्थ

बुधवार, ता. २९ फेब्रुवारी, १९५६



*संस्थापक :*
**प्रो. वामन गोविंद काळे**

*संपादक :*
**श्रीपाद वामन काळे**


## हातमाग विणकरांना सूचना

सोलापूर जिल्ह्यांतील मैंदर्गी ह्या ठिकाणीं मुंबई राज्यांतील अखिल भारतीय हातमाग–सप्ताह साजरा करण्यांत आला. ह्या तिसऱ्या सप्ताहाचें उद्घाटन राज्याचे सहकार मंत्री श्री. एम. पी. पाटील ह्यांनीं केलें. हातमागाच्या कापडांत विविधता आणण्यासाठीं मुंबई सरकारनें पुणें येथें एक संशोधन केंद्र चालू केलेलें आहे. अक्कलकोट तालुक्यांतील मैंदर्गी गांवांत सप्ताह साजरा करण्यांत औचित्य होतें. ह्या गांवाची लोकसंख्या सुमारें १४,००० आहे, आणि त्यांपैकी ७,००० पेक्षा अधिक रहिवासी हातमागावर कापड विणून आपली गुजराण करतात. ह्यांनीं आपली सहकारी संस्थाहि स्थापन केलेली आहे. ही संस्था नमुनेदार पद्धतीनें आपला कारभार चालवीत आहे. सोलापूर जिल्ह्यांत अत्युत्तम रीतीनें कार्य करीत असलेली म्हणून ह्या संस्थेला नुकतीच एक चांदीची ढाल गुणगौरवार्थ देण्यांत आलेली आहे. समारंभप्रसंगीं बोलतांना श्री. पाटील म्हणाले कीं, हातमाग विणकरांनीं आपल्या कापडांत अधिक विविधता आणली पाहिजे आणि त्यांत अधिक सुबकपणाहि आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. दरवर्षीं ३०० कोटी वार कापड तयार करण्याचें उद्दिष्ट देशापुढें ठेवण्यांत आलें आहे. हातमागाच्या धंद्याची व्यवस्था जर योग्य रीतीनें करण्यांत आली तर हें उद्दिष्ट गांठणें सुलभ जाईल. ह्याच प्रसंगीं श्री. पाटील ह्यांनीं विणकरांच्या वसाहतीच्या पायाचा दगडहि बसविला. ह्या वसाहतींत १०० विणकरांच्या बिऱ्हाडांची सोय करण्यांत येणार आहे. मैंदर्गी गांवच्या सहकारी–संस्थेनें गाळे बांधण्यांत भाग घेण्याचे ठरविलें आहे. ह्या भागांत आणखीही कांहीं गांवांतून विणकरांच्या सहकारी संस्था आहेत. त्यांपैकी वळसंग येथील संस्थाहि श्री. पाटील ह्यांनीं नजरेखालून घातली.

## दुसऱ्या कार्यक्रमांत क्षयरोगविरोधी मोहीम

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत क्षयरोगाविरुद्धची मोहीम अधिक जोरानें चालविण्यांत येणार असल्याचें कळतें. क्षयरोगप्रतिबंधक बी. सी. जी. लस मोठ्या प्रमाणावर सरसहा टोंचण्यांत आली तर भारतांतील क्षयरोगानें मृत्यु पावणाऱ्या लोकांची संख्या १५ ते २० वर्षांच्या अवधींत सध्यांच्या एक पंचमांशच होईल, असा नियोजन–समितीचा अंदाज आहे. भारतांत क्षयरोगानें दरसाल ५ लाख माणसें दगावत असावींत असा अंदाज आहे. क्षयरोगानें पछाडल्या जाणाऱ्या लोकांची एकूण संख्या तर २५ लाखांच्या घरांत असावी. त्यामुळें ९० ते १०० कोटी कामाचे दिवस वजा जातात. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत क्षयरोगावर इलाज करणाऱ्या अधिक संस्था ठिकठिकाणीं काढण्यांत आल्या. त्या कालांत ९ आरोग्यधामें, २ इस्पितळें आणि ५३ क्लिनिक्स काढण्यांत आलीं. १९५५–५६ सालांत त्यांची संख्या अनुक्रमें ४६,५० व १८० इतकी झाली आहे. क्षयरोग्यांसाठीं आणखी १०,००० खाटांची सोय करण्याचें पहिल्या कार्यक्रमांत ठरविण्यांत आलें होतें. १९५१ सालीं बी. सी. जी. लस टोंचण्याचें काम करणारे ७३ वैद्यकीय गट करीत होते. १९५५–५६ सालीं १३७ वैद्यकीय गट हें काम करीत आहेत. १९५५ सालीं मदनपल्ली ह्या ठिकाणीं क्षयरोगी मुलांच्यासाठीं एक इस्पितळ स्थापन करण्यांत आलें. असेंच दुसरें एक इस्पितळ दिल्लीजवळ मेहेरोली ह्या ठिकाणीं काढण्यांत येणार आहे. देशाच्या निरनिराळ्या भागांत क्षयरोगाचा प्रसार कितपत झाला आहे हें अजमावण्यासाठीं भारतीय सरकार तपासणी करणार आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च ह्या संस्थेच्या क्षयरोगविषयक उपसमितीनें तपासणीसाठीं एक योजनाहि आखून ठेवली आहे.

## कुटुंब–नियोजन–विषयक भारतीय संस्था

भारतीय सरकारनें लोकांच्या रहाणीचें काम वाढविण्यासाठीं आर्थिक विकासाच्या पंचवार्षिक योजना अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. तथापि, लोकसंख्येच्या बेसुमार वाढीला आळा घातल्याशिवाय दारिद्र्य कमी होणार नाहीं ही गोष्ट सर्वांना पटलेली आहे. कुटुंबनियोजनाविषयीं शिक्षण देणारी आणि त्यासंबंधीं संशोधन करणारी एक अखिल भारतीय संस्था आतां स्थापन करण्यांत येणार आहे असें समजतें. ह्या संस्थेंत डॉक्टर्स, परिचारिका, आरोग्य–तपासनीस आणि सामाजिक कार्यकर्ते ह्यांना कुटुंबविषयक प्रश्नांसंबंधीं शिक्षण देण्यांत येणार आहे. चालू आर्थिक वर्षांत योजनेवर २३ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कुटुंबनियोजनविषयक योजना समाविष्ट करण्यांत आली होती व तीसाठीं ६५ लाख रुपयांच्या रकमेची तरतूद करण्यांत आली होती. ह्या विषयासंबंधीं संशोधन करण्यासाठीं तीन प्रायोगिक केंद्रें उघडण्यांत आलीं होतीं. त्यांपैकी दोन दिल्ली येथें आणि एक म्हैसूर राज्यांत होतें. ह्या केंद्रांतून कुटुंबनियोजनाच्या 'सुरक्षित काळा'च्या पद्धतीविषयीं संशोधन करण्यांत आलें. डिसेंबर १९५५ अखेर मध्यवर्ती सरकारनें राज्य सरकारें, स्थानिक स्वराज्य संस्था आणि कुटुंबनियोजनविषयक खाजगी संस्था ह्यांना मिळून ९,६५,८५४ रुपये मदत म्हणून दिले. कुटुंबनियोजनाच्या बाबतींत कृत्रिम संततिप्रतिबंधक साधनांचा कितपत उपयोग होऊं शकेल त्याचा अभ्यास करण्यासाठीं मुंबई येथील कॅन्सर रिसर्च इन्स्टिट्यूटमध्यें एक प्रयोगकेंद्र खोलण्यांत आलें आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत कुटुंबनियोजनविषयक खर्चाचा आकडा ३१·७२ लाखांपर्यंत जाईल.

**इराणमधील धरण**— इराणमध्यें बांधण्यांत यावयाच्या ५०० फूट उंचीच्या धरणासाठीं भाकरा–नानगल धरणावरील प्रमुख अमेरिकन एंजिनिअर मि. स्लोकम ह्यांनीं सल्ला द्यावयाचें कबूल केलें आहे. तथापि, धरण बांधण्याचें प्रत्यक्ष काम अंगावर घ्यावयास त्यांनीं नकार दिला. भाकरा–नानगल धरणाचें बांधकाम भारतीय एंजिनिअर्सच करीत आहेत.

## मुंबई राज्याचें अंदाजपत्रक

(आंकडे कोटि रुपयांचे)

| १९५४–५५ | १९५५–५६ | १९५५–५६ | १९५६–५७ |
|---|---|---|---|
| हिशेब | संकल्प | दुरुस्त संकल्प | संकल्प |
| जमा | जमा | जमा | जमा |
| ७९.४३ | ८०.१० | ७९.७२ | ७८.१० |
| खर्च | खर्च | खर्च | खर्च |
| ७१.४९ | ७९.८८ | ७८.८९ | ७७.८६ |
| शिल्लक | शिल्लक | शिल्लक | शिल्लक |
| ७.९३ | ०.२२ | ०.८२ | ०.२३ |

## मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें पहिलें वर्ष


(आंकडे लक्ष रुपयांचे)

| विकासाचें सदर | दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यांत दर्शविलेला खर्च | १९५६–५७ या वर्षांतील तरतूद |
|---|---|---|
| शेती व सामुदायिक विकास ... | ६३,९७ | १०,९२ |
| पाटबंधारे व विद्युत् शक्ति ... | १,२१,४० | १९,८६ |
| उद्योगधंदे व खाणी ... | ८,७८ | १,५८ |
| वाहतूक व दळणवळण ... | २२,५८ | ४,५२ |
| शिक्षण ... | ९,६८ | १,५६ |
| आरोग्य ... | २२,०३ | ६,५४ |
| घरबांधणी ... | २१,४८ | ३,१४ |
| इतर सामाजिक कामें ... | ८,२९ | ९८ |
| शास्त्रीय व औद्योगिक संशोधन, भाषा, साहित्य, कला व संस्कृति, इतर सर्व कार्यें | ४,६५ | ४१ |
| एकूण ... | २,८२,८६ | ४९,४१ |

**सिकिम राज्याचें उत्पन्न**—भारताशीं संलग्न असलेल्या सिकिम राज्याचें उत्पन्न गेल्या वर्षी ५० लाख रुपयांपर्यंत वाढलें. १९५२ सालीं राज्याचें उत्पन्न १८ लाख रुपयांपेक्षा थोडें अधिक होतें. राज्याचे दिवाण म्हणून एक भारतीय आय. सी. एस. अधिकारी काम करीत आहेत. चालू वर्षी ह्याहिपेक्षा अधिक वाढ होईल असा त्याचा अंदाज आहे.

**१९५३ मधील भारतीय चित्रपट**—१९५३सालीं भारतांत २५९ नवे चित्रपट तयार करण्यांत आले. ह्या बाबतींत अमेरिकेचा अनुक्रम पहिला व जपानचा दुसरा लागतो. अमेरिकेंत ३४४ व जपानमध्यें ३०२ चित्रपट तयार करण्यांत आले. सर्व जगभर मिळून १,००,००० सिनेमागृहें असून त्यांमधून दरसाल ५ कोटी लोक तरी सिनेमा पाहतात असा अंदाज आहे.


**विवाह करण्यासाठीं प्रलोभन**—झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें विवाह करण्यास उत्सुक असणाऱ्यांना प्रलोभनें जाहीर केलीं आहेत. संसाराच्या पहिल्या मांडणीसाठीं लागणारा पैसा सरकार त्यांना कर्जाऊ देतें. कर्ज १५ वर्षांत फेडावयाचें असतें. पण जोडप्याला ६ मुलें झाल्यावर कर्जच माफ करण्यांत येतें. देशांत अधिक लोकांची आवश्यकता असल्यानें हा उपक्रम सुरू करण्यांत आला आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



# ग्रामीण पतपाहणी अहवाल

## सरकारी पैशाचा पुरवठा, भागीदारी व नियंत्रण ह्यानें उद्दिष्ट साध्य होईल काय ?

( सहकारी चर्चामंडळ, पुणें, येथें श्री. य. द. खोले ह्यांचें दि. ३१–१२–१९५५ रोजीं झालेलें भाषण )

आपला देश शेतीप्रधान असून लोकसंख्येपैकी ७० टक्के जनता शेतीव्यवसायावर अवलंबून आहे, आणि अशा बहुसंख्य जनतेसाठी सरकारनें आर्थिक मदतीची उपाययोजना करणें क्रमप्राप्तच आहे. या आर्थिक मदतीच्या योजनेसाठी वेळोवेळीं समित्या व कमिशन्स नेमलीं गेलीं, परंतु शास्त्रशुद्ध अशी आर्थिक पाहणी अद्यापपर्यंत झाली नव्हती. परकीय सत्ता असतांना त्यांनीं याबाबत उपाययोजना म्हणून सहकारी चळवळीची सुरवात केली व त्यास आतां पन्नास वर्षें होऊन गेलीं. या सहकारी चळवळीचा शेतकीव्यवसायास फारसा उपयोग झाला नाहीं असा निष्कर्ष समितीनें काढला आहे.

दुसरें महायुद्ध संपण्याचा अंदाज दिसतां, त्यावेळचे सरकारनीं युद्धोत्तर पुनर्रचनेच्या दृष्टीनें हालचाली सुरू केल्या. युद्ध संपल्यानंतर आर्थिक घडी व्यवस्थित बसावी, तसेंच लष्करी पेशा सोडून मुलकी व्यवसायाकडे वळणाऱ्या लोकांना योग्य व्यवसाय मिळावा यासाठी विचारपूर्ण योजना तयार करण्याचा प्रयत्न झाला व त्याप्रमाणें सहकारी चवळवळीचें नियोजन कसें करावें यासाठी श्री. सरय्या यांचे अध्यक्षतेखाली व शेतीकर्जपुरवठ्याची पुर्नघटना सुचविण्यासाठी प्रा. ध. रा. गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली अशा दोन समित्या नेमल्या. या समितीनें ज्या सूचना केल्या त्याची अंमलबजावणी मुख्यतः मुंबई राज्यांत प्रथमतः सुरवात झाली. सरय्या समितीनें सहकारी चळवळीची ठराविक पद्धतीनें वाढ झाली पाहिजे; लोकसंख्येचे दृष्टीनें ठराविक प्रमाणांत लोकसंख्या सहकारी चळवळींत आली पाहिजे; व शेतीव्यवसायासाठी लागणारा पैसा सहकारी संस्थांमार्फत पुरविला पाहिजे व त्यासाठी सरकारचे आर्थिक व तसेंच जकातविषयक धोरण बदललें पाहिजे अशा शिफारसी केल्या. गाडगीळ समितीनें शेतकऱ्यास कर्जपुरवठा निश्चित झाला पाहिजे, व्याजाचा दर परवडेल असा झाला पाहिजे, व शेतकऱ्यांचीं कर्जें कायद्यानें कमी झालीं पाहिजेत व यासाठी सहकारी चळवळीची पुनर्घटना झाली पाहिजे, असा निष्कर्ष काढला. या समितीची दुसरी अशी सूचना होती कीं, जो शेतकरी स्वतः शेती कसतो त्यास उत्पादनासाठी पिकाचे खर्चाचे मानानें व परतफेडीच्या ऐपतीप्रमाणें कर्ज मिळावें. याचा अर्थ कीं, तो जमीन खंडानें करीत असला तरी त्यास कर्ज मिळावें व केवळ जमीन तारण न मागतां पिकाचे तारणावर कर्ज दिलें जावें व सहकारी संस्थांची सभासदत्वाची योजना ऐच्छिक असूं नये. हा मूलभूत फरक करण्यानें सहकारी चळवळीचें ऐच्छिक स्वरूप बदलणार होतें. गाडगीळ समितीनें पीककर्जाबरोबरच मध्यम मुदतीचें कर्ज दिलें जावें अशीहि सूचना केली होती. या पुर्नघटनेसाठी व ठराविक काळांत व प्रमाणांत गांठावयाचें ध्येय हें सरकारी धोरण असें ठरणार असल्यानें सहकारी चळवळीचें ऐच्छिक स्वरूप राहणार नव्हतें त्यासाठी सरकारनें पुढाकार घ्यावा असा त्या समितीचा आग्रह होता. शेती-कर्जपुरवठा सहकारी चळवळींमार्फत व्हावा हें उत्तम. परंतु त्यासाठी सहकारी चळवळीच्या कल्पना बदलल्या पाहिजेत व त्यासाठी सरकारनियुक्त असें क्रेडिट कॉर्पोरेशन काढलें पाहिजे. सहकारी चळवळीची पुनर्घटना सुचवितांना सरकारकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदतीची अपेक्षा करण्यांत आली. प्रांतिक सरकार व रिझर्व बँक यांजकडून आर्थिक मदत अपेक्षित केली व मदतीबरोबर सरकारचे प्रतिनिधी प्रांतिक सहकारी बँकेचे बोर्डावर घेण्यास व रिझर्व बँकेकडून बँकांची तपासणी करण्यास मान्यता दिली गेली.

गाडगीळ-समितीच्या शिफारसी आपल्या प्रांतांत अंमलांत आणण्याचे सर्व कार्यकर्त्यांनीं मान्य केलें व त्याप्रमाणें सर मणिलाल नानावटी यांचे अध्यक्षतेखाली समिति नेमली जाऊन त्यांच्या शिफारसीप्रमाणें आपलेकडे व्यवस्था झाली. परंतु या नवीन व्यवस्थेप्रमाणें किती कामगिरी झाली याचें मूल्यमापन होऊं शकलें नाहीं व गाडगीळ-समितीच्या अपेक्षेप्रमाणें फारसें कार्यहि झालें नाहीं. किंबहुना हें काम सहकारी चळवळीस झेपणार नाहीं असें कार्यकर्त्यांना वाटूं लागलें. एकीकडे मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकार व रिझर्व्ह बँक सहकारी चळवळीस मदत करीत असतां शेतकऱ्यांना कर्जपुरवठा होण्यास बऱ्याच अडचणी येऊं लागल्या आणि सहकारी चळवळीशीं प्रत्यक्ष संबंध रिझर्व्ह बँकेचा आल्यावर त्यांना असें वाटूं लागलें कीं शेतीकर्जपुरवठ्याची शास्त्रशुद्ध पाहणी करून त्या आधारें पुढील योजना आंखली पाहिजे.

रूरल क्रेडिट सर्व्हेसमितीचा अहवाल प्रसिद्ध होऊन त्यावर चर्चाहि पुष्कळ झाली आहेच. मध्यवर्ती सरकारनें समितीच्या शिफारसी स्वीकारून योग्य ते कायदे मध्यवर्ती कायदेमंडळांत आतां पसारहि करून घेतले आहेत. कांहीं प्रांतांतून पुरस्कृत (पायलट) योजनाहि अंमलांत आणल्या जात आहेत. या समितीचे अहवालावर पुणें येथें चालू असलेल्या आर्थिक परिषदांमधूनहि चर्चा होत आहेच.

या समितीनें पहाणी केली व समितीस असें दिसून आलें कीं, शेतीउत्पादनासाठी लागणाऱ्या कर्जापैकीं सहकारी चळवळ व सरकार याजमार्फत फक्त ६ टक्के कर्जपुरवठा होतो व बाकीचा कर्जपुरवठा खाजगी सावकारांकडून होतो. ही शोचनीय स्थिति असून सहकारी चळवळ याबाबत तरी अयशस्वी झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. वरील ६ टक्के कर्जपुरवठा हा सुद्धां लहान शेतकऱ्यांपर्यंत जाऊं शकत नाहीं; तो फक्त मोठे शेतकऱ्यास मिळतो आणि या दृष्टीनें सरकारनें पुढाकार घेऊन शेतकऱ्यास योग्य तऱ्हेनें कर्जपुरवठा होईल अशी व्यवस्था करणें व तीहि सहकारी संस्थांमार्फत होणें हें अगत्याचें आहे आणि यासाठी, मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकार, रिझर्व्ह बँक व सहकारी संघटना यांनीं पुढें आलें पाहिजे.

समितीच्या मुख्य शिफारसी अशा कीं, देशांतील सर्व पैसा एकत्रित यावा; तसेंच शेतीमालाची विक्री व त्याचें रूपांतर सहकारी संस्थांमार्फत व्हावें. रिझर्व्ह बँक व सरकारनें निरनिराळे मोठे फंड काढून त्याद्वारां सहकारी चळवळीस मदत करावी; सहकारी संस्था कार्यक्षम व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील असे त्यांचे घटक असावेत. देखरेखीची व्यवस्था मध्यवर्ती सहकारी संस्थांकडे यावी; तसेंच सहकारी संस्थांमधील नोकरवर्ग सहकारी शिक्षण घेतलेला असावा व त्यासाठी शिक्षणाची व्यवस्था व्हावी, वगैरे सूचना समितीनें केल्या आहेत.

ग्रामीण भागांतील पैसा सुलभ दृष्टीनें एका टोंकाकडून दुसरीकडे जावा या दृष्टीनें ग्रामीण भागांत बँकांचें शाखांचें जाळें पसरणें जरूर आहे व यासाठी इंपीरिअल बँकेचें रूपांतर स्टेट बँकेंत करण्याची सूचना केली. या बँकेनें ठराविक मुदतींत ग्रामीण भागांत शाखा काढल्या पाहिजेत, व स्टेटबँकेचे शेअर्स मध्यवर्ती सरकार व रिझर्व्ह बँकेनें घेण्याची तरतूद केली. अशा रीतीनें सर्व पैसा एकत्रित आल्यानें व सरकारी नियंत्रणाखालीं ती बँक आलेवर सर्व पैसा एकत्रित येऊन ग्रामीण भागांत तो उपलब्ध करतां येईल व स्टेट बँकेचे सहकारी चळवळीशीं निगडित संबंध येतील. स्टेटबँकेचा स्थानिक अधिकारी हा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बोर्डावर राहणार आहे, हेंहि ध्यानीं घेण्यासारखें आहे. प्रांतिक सहकारी संस्थांपासून ते थेट ग्रामीण पतपेढींपर्यंत सरकार प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष भागीदारी करणार असून सहकारी संस्थांना पैशाचा भरपूर पुरवठा करणार आहे. सहकारी मध्यवर्ती बँकेचे बोर्डाचे घटनेंतहि फरक करून सहकारी सोसायटीच्या संस्थांना जास्त प्रमाणावर बहुमत मिळणार आहे.

शेतकी पतपुरवठ्याची योजना हातांत घेतांना केवळ भरपूर कर्जपुरवठा करणें हें महत्त्वाचें कार्य नाहीं. तर शेतीमालाची सहकारी तत्त्वावर खरेदी-विक्री करणें, मालाची सांठवण करून योग्य भाव येतांच त्याची विक्री करणें, तसेंच शेतीमालाचें रूपांतर पक्क्या मालांत करणें, हेंहि कार्य या पुनर्घटनेमध्यें आहे आणि त्यादृष्टीनें ग्रामीण विभागांत स्टेट बँकेच्या शाखा झाल्यानंतर या कार्यासाठीं लागणार पैसा पुरवतां येईल. त्याचबरोबर शेतकऱ्यांची बचतशक्ति वाढावी म्हणून चिट फंडासारखे फंड उभारून त्या बचतीमधून शेतकऱ्यांस त्यांच्या दैनंदिन कामासाठी पैसा मिळूं शकेल. हें सर्व करीत असतां कार्यक्षम व योग्य तऱ्हेनें शिक्षण घेणारा नोकरवर्ग उपलब्ध व्हावा म्हणून शिक्षणावरहि भर दिला जाणार असून त्यासाठी व्यवस्था होणार आहे. त्यांत केवळ सहकारी संस्थेच्याच नोकरांनाच शिक्षण देणार असें नाहीं, तर सहकारी खात्यांतील नोकर व अधिकारीवर्ग यांनाहि शिक्षण दिलें जाईल.

सहकारी संस्थांची घटना यापूर्वी त्यांचें कार्यक्षेत्र गांवापुरतें मर्यादित राहील अशा प्रकारें ठरविलें जात होतें. परंतु अशा प्रकारें संस्थेचा व्यवहार हा मर्यादित असे व त्यामुळें त्यांना लायक नोकरवर्ग उपलब्ध होत नसे व त्यामुळें त्यांची भरभराट होण्यास अडचण होत असे. समितीनें आतां अशी सूचना केली आहे कीं, केवळ गांवापुरतें कार्यक्षेत्र मर्यादित न राहतां कांहीं गांवांसाठी मिळून एक मोठी संस्था असावी कीं ज्यामुळें सोसायटीची कार्यकक्षा मोठी होईल व त्यांना लायक व कार्यक्षम नोकरवर्ग ठेवतां येईल.

सहकारी संस्थांचे देखरेखीचा प्रश्न हा फार महत्त्वाचा समजला आहे. आजपर्यंत ही देखरेखीची व्यवस्था अनेक स्थित्यंतरांतून गेली आहे. कांहीं वेळ ती अगदीं लोकमतानुवर्ती होती तर आतां देखरेखीचा नोकरवर्ग सरकारी आहे. सहकारी बँक व सुपरवायझिंग युनिअन यांची दुबार देखरेख होते त्याऐवजीं ती मध्यवर्ती सहकारी बँकांकडे यावी अशी समितीची शिफारस आहे व ती मान्य झाल्यासारखी आहे.

शेतीकर्जपुरवठा हा प्रश्न फार महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा आहे. आजपर्यंत याबाबत अनेक कमिशन्स नेमून त्याचप्रमाणे समित्या नेमून तो सोडविण्याचा प्रयत्न झाला. तथापि आपल्या देशाची राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिति लक्षांत घेऊन हा प्रश्न सोडवणें जरूर आहे. ज्याअर्थी याबाबत अनेक शिफारसीप्रमाणें हा प्रश्न अद्याप सोडवूं शकलों नाहीं त्याअर्थी तो आतां या पतपाहणीसमितीच्या शिफारसीप्रमाणें सोडवूं शकूं असें नाहीं. तथापि आतां ज्याअर्थी मध्यवर्ती सरकार तसेंच प्रांतिक सरकार यांनीं शिफारसी मान्य करून त्याप्रमाणें पावलें टाकण्यास सुरवात केली आहे, त्याअर्थी यासंबंधीं साधकबाधक विचार करणें जरूर आहे व त्याचे परिणाम देशाचे अर्थव्यवस्थेवर काय होणार हें पाहिलें पाहिजे.

तपशीलवार सूचना करतांना समितीनें असें सुचविलें आहे कीं, रिझर्व बँकेनें प्रांतिक सरकाराला लांब मुदतीचें कर्ज देण्याचा अधिकार द्यावा कीं त्यामुळें प्रांतिक सरकार प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें सहकारी संस्थांच्या भांडवलामध्यें रक्कम गुंतवूं शकेल. लँड मार्गेज बँकेचे भागांतहि पैसे गुंतविणें शक्य होईल. रिझर्व बँक अल्प मुदतीचें व मध्यम मुदतीचें कर्जहि सहकारी संस्थांना देईल. ही रक्कम गुंतविण्याची सध्यांची रु. ५ कोटींची मर्यादा रद्द करून प्रांतिक सहकारी संस्था व मध्यवर्ती सहकारी बँका यांची आर्थिक परिस्थिति पाहून ठरवावी. नॅशनल ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट फंड निर्माण करून त्यामधून ही रक्कम देण्याची व्यवस्था करावी अशी सूचना आहे. नॅशनल ॲग्रिकल्चर क्रेडिट स्टॅबिलायझेशन फंड निर्माण करून या फंडाचा उपयोग प्रांतिक सरकार सहकारी बँकांना मध्यम मुदतीचें कर्ज देण्याकडे व्हावयाचा आहे. नॅशनल को-ऑप. डेव्हलपमेंट फंड व वेअरहाऊसिंग बोर्ड स्थापन करावें व नॅशनल को. डे. फंड मधून प्रांतिक सरकारास पैसे देऊन त्यांनीं शेतीमालाचें रूपांतर सहकारी मालविक्री, व डेअरी यासाठी खर्च करावा. या सर्व दृष्टीनें समितीनें असें सुचविलें आहे कीं, रिझर्व बँकेनें नॅशनल क्रेडिट फंडासाठी वार्षिक रु. ५ कोटी द्यावेत; स्टॅबिलायझेशन फंडासाठी वार्षिक १ कोट रुपये द्यावेत. मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेतकी खात्यातर्फे नॅशनल ॲग्रिकल्चरल क्रेडिट फंड रिलीफसाठी वार्षिक १ कोट रुपये द्यावेत. नॅशनल को. डेव्हलपमेंटफंडासाठी व वेअरहाऊसिंग सोसायटीसाठी रु. ५ कोटी द्यावेत व ते वरील सारखे कामासाठी द्यावेत.

या सर्व सहकारी चळवळीच्या वाढीसाठी : समितीनें पैसा कसा उपलब्ध करावा हें तपशीलवार सुचविलें आहे. परंतु शेतमालाचे स्थिर भाव राहण्याचे दृष्टीनें सरकारनें काय करावें याबद्दल सूचना नाहींत. त्याचप्रमाणें निरनिराळ्या सरकारचे जमीनविषयक कायदे होत आहेत. त्यांचा परिणाम एकंदर सहकारी अर्थव्यवस्थेवर काय होईल याचाहि विचार केला जात नाहीं. जमीनविषयक कायद्यानें जमिनीची खरेदी-विक्री नियमित झाली किंवा जमिनीस योग्य किंमत येऊं शकत नसली तर किंवा तिची मालकी सहज बदलूं शकत नसली तर सहकारी अर्थव्यवस्थेवर मोठी आपत्ति येणार असें दिसतें. अशा वेळीं सहकारी संस्थेमार्फत नुसता पैशाचा पुरवठा किंवा शेतीमालाचें उत्पादन किंवा त्यांचें रूपांतर करून कसें भागेल? राजकीय किंवा सामाजिक परिस्थिति लक्षांत घेऊन, जमीनविषय कायदे हे सहकारी अर्थव्यवस्थेस पोषक होतील असें वाटत नाहीं.

यानंतर दुसरा विचाराचा मुद्दा असा कीं, सरकारी नियंत्रणाखालीं शेतीउत्पादनासाठी रिझर्व्ह बँकेनें अगर मध्यवर्ती व प्रांतिक सरकारनें शेतकऱ्यास पैसा पुरविला. परंतु त्याबरोबरच

शेतीउत्पादनाचें नियोजनाहि व्हावयास पाहिजे, आणि तें करणें झाल्यास सहकारी तत्त्वावर शेती होणें अगत्याचें आहे. आज तरी त्यास परिस्थिति अनुकूल आहे असें वाटत नाहीं.

सर्व परिस्थितीचा व पुनर्घटनेचा विचार करतां शेतीव्यवसाय जर मुळांतच तुटीचा असेल तर नुसता पैसा पुरवून काम भागेल कीं शेती चांगल्या पद्धतीनें करून उत्तम बीं-बियाणें, खतें वापरून जास्त उत्पादन निघून ती फायदेशीर होईल, यांचा विचार व्हावयास पाहिजे. शेत पतपुरवठा प्रश्नांचा विचार करतांना भांडवलाचा पुरवठा कसा होईल याचाच विचार केला जातो परंतु त्याबाबत उत्पादन, मागणी, पुरवठा व येणारी किंमत याचा विचार केला जात नाहीं.

समितीनें केलेल्या शिफारसी प्रांतांतील तीन जिल्ह्यांत अंमलांत आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे निवडलेले जिल्हे एकाच प्रकारच्या सांच्यांत बसणारे आहेत व त्यामुळें त्याचे परिणाम काय होतील हें कळणें कठीण आहे. ज्या ठिकाणीं अवर्षण, अवेळीं पाऊस व त्यामुळें दुष्काळी परिस्थिति आहे असा एखादा जिल्हा घ्यावयास पाहिजे होता. असें झालें नाहीं. तसेंच सर्व सहकारी संस्थांच्या सामुदायिक कार्याचें शास्त्रीय मूल्यमापन व्हावयास पाहिजे व त्याचे निष्कर्ष लक्षांत घेऊन त्याबाबत योग्य त्या सुधारणा झाल्या पाहिजेत.

सहकारी चळवळीचें आतां सरकारी चळवळ असें स्वरूप राहणार हें क्रमप्राप्तच अगर आवश्यक आहे याचा विचार करावयास पाहिजे. अलिकडील घटनांवरून आतां सहकारी चळवळ ही लोकांची राहणार नाहीं तर ती सरकारच्या खात्यामार्फत चालणार. ती प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष त्यांचे देखरेखीखालीं चालणार आणि याचें कारण सरकारची त्यांत भागीदारी असणार हें होय. ५० वर्षांत लोकांचे हातीं असलेली सहकारी चळवळ यशस्वी झाली नाहीं ती आतां सरकारचे मदतीनें यशस्वी करण्याचा प्रयत्न व्हावा, हें चमत्कारिक वाटतें. सहकारी चळवळींत आतां येणारे हे लोक त्यांचा चळवळीवर विश्वास आहे म्हणून येणार नसून तो एक आपद्धर्म आहे म्हणून येणार हें निश्चित; आणि अशा परिस्थितींत सहकारी चळवळ लोकांची किती प्रमाणांत राहणार याचा विचार व्हावयास पाहिजे. समिति आपले अहवालांत असें म्हणतें कीं सुरवातीस सहकारी संघटनेस अशी मदत पाहिजे कीं ती त्याविरुद्ध हितसंबंधीं लोकांस यशस्वी तऱ्हेनें तोंड देऊं शकेल. यापूर्वीची सरकारी मदत आर्थिकदृष्ट्या कमी व कारभारविषयक जास्त असे. आतां ग्रामीण जिवनाविषयीं आस्था, ग्रामीण भागांतील इच्छा व त्यांचें मार्गदर्शन या आवश्यक गोष्टी आहेत. आणि यादृष्टीनें सरकारनें खेडेगांवांतील दुबळे लोकांसाठी पुढें येऊन त्यांना स्वार्थी लोकांपासून संरक्षण दिलें पाहिजे. हें होणार कसें हा प्रश्न आहे. खेडेगांवांतील शिक्षणाचा अल्प प्रचार, पुढारीपण च स्वार्थी दृष्टि लक्षांत घेतां समितीचे शिफारसीप्रमाणें सरकारनें दुबळ्यांना स्वार्थी लोकांपासून वांचविण्याचा प्रयत्न केला तरी ते 'पुढारी' म्हणून मिरविणाऱ्या स्वार्थी लोकांचे जाळ्यांत सांपडणारच आणि यादृष्टीनें नुसता पैशाचा पुरवठा, सरकारी भागीदारी, किंवा सरकारी नियंत्रण यानें चळवळीची प्रगति होईल असें वाटत नाहीं; तर लोकांचे हातीं चळवळ ठेवून सहकारी चळवळीच्या तत्त्वाचा जोरदार प्रचार करून त्यावर श्रद्धा निर्माण होईल, असा प्रयत्न करणें जरूर आहे.

**रशिआची जय्यत तयारी**— चालू वर्षीं ऑस्ट्रेलियांतील मेलबोर्न ह्या शहरीं ऑलिंपिक सामने भरणार आहेत. ह्या सामन्यांत भाग घेणाऱ्या रशिअन खेळाडूंना तयार करण्यासाठी ४½ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. सामन्यांत अमेरिकन खेळाडूंचा रशिअन खेळाडू पराभव करतील असें भाकीत एका अमेरिकन खेळाडूंच्या शिक्षकानें केलें आहे.

**भारताचा भौगोलिक मध्यबिंदु**—जबलपूर जिल्ह्यांतील सिहोरा ह्या गांवाजवळ भारताचा भौगोलिक मध्यबिंदु असल्याचें शास्त्रज्ञांचें मत आहे. ह्या ठिकाणीं १ लाख रुपये खर्च करून एक स्तंभ उभारण्यांत येणार आहे. नागपूरपासून ३५ मैलांवर असलेल्या रामटेक ह्या गांवीं महाकवि कालिदासाचें स्मारक बांधण्यांत येणार आहे. ह्याच ठिकाणीं कालिदासानें 'मेघदूत' रचलें अशी आख्यायिका आहे.

---


# NOTICE

## The Belgaum Bank Limited, Belgaum.

Notice is hereby given that the annual General Meeting of the Share-holders of the Bank, will be held on Tuesday, the 20th March 1956, at the Bank's own building at Raviwar Peth, Belgaum, at 2 p. m., to transact the following business.

1. To receive and adopt the report of the Directors and the audited Statement of Accounts, for the year ended 31st December 1955.

2. To declare a Dividend.

3. To fill up the vacancies caused by the retirement of your Directors mentioned below :—

(1) Shri M. G. Herekar,
(2) Shri G. L. Gajendragadkar, and
(3) Shri B. B. Potdar.

The retiring Directors are eligible for re-election and they offer themselves for re-election.

4. To appoint Auditors and to fix their remuneration.

5. To do such other work as may be placed before the meeting with the permission of or by the Chairman.

Belgaum, By Order of the Board,
20-2-1956. **M. G. Herekar,**
*Chairman.*

---

Share-holders desiring to ask any questions at the General Meeting, are requested to send them to the Chairman before 13th March 1956, for covenience.

---

The Transfer books of the Company will be closed from 1st March 1956, to 20th March 1956, both days inclusive.

---

The Dividend, when sanctioned, will be paid on or after 27th March 1956. The Shere-holders are requested to communicate their change of address, if any.

## रेल्वेजचें अंदाजपत्रक

( कोटी रु. )

| | १९५४-५५ प्रत्यक्ष | १९५५-५६ अंदाज | १९५५-५६ दुरुस्त अंदाज | १९५६-५७ अंदाज |
|---|---|---|---|---|
| वहातुकीचें उत्पन्न | २८९·७८ | २९२·५० | ३१४·१० | ३४५·०० |
| चालू खर्च | २०६·०९ | २०६·८० | २१४·४१ | २२४·३० |
| किरकोळ खर्च | ६·६३ | ७·४९ | ८·९५ | १३·०४ |
| घसारा फंडाकडे वर्ग | ३०·०० | ३५·०० | ४५·०० | ४५·०० |
| एकूण | २४२·७२ | २४९·२९ | २६८·३६ | २८२·३४ |
| निव्वळ वाढावा | ४४·०६ | ४३·२१ | ४५·७४ | ६२·६६ |
| मध्यवर्ती सरकारकडे वर्ग | ३४·९६ | ३६·०७ | ३६·१६ | ३९,६७ |
| शिल्लक | ९·१० | ७·१४ | ९·५८ | २२·९९ |

### अल्प बचत व भांडवलाची घडण

भारतीय सरकारचे नॅशनल सेव्हिंग्ज कमिशनर श्री. एस. मलहोत्रा ह्यांनीं बंगलोर येथें पत्रकारांना मुलाखत देऊन बचत करण्याविषयीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, भारतांतील भावी समाजरचना आतां समाजवादी पद्धतींची होणार आहे. म्हणून, देशांतील सामान्य नागरिकांनीं बचत करून भांडवलाची उभारणी करण्याच्या कामांत मदत केली पाहिजे. भांडवलदारांची जागा आतां त्यांनीं घेतली पाहिजे. राष्ट्रीय भांडवलाचा संचय करण्याच्या आणि त्याची पातळी वाढवीत नेण्याच्या कामीं अल्प बचतीच्या योजनेचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे. सामाजिक हिताचीं कामें करण्याच्या वृत्तींतूनच बचत करण्याच्या कल्पनेचा उगम झालेला आहे. कारण पैसा योग्य कारणासाठीं खर्च करणें आणि योग्य कारणाकरतां तो वापरणें ह्या दोन्ही गोष्टी समाजहिताच्याच आहेत. बचतीची संवय असणें हें चांगल्या नागरिकाचें लक्षण आहे. तथापि ही सवय गटागटांनीं स्वेच्छेनें लावून घेतलेली असल्यास तिचा पाया अधिक रुंद होतो हें लक्षांत घेतलें पाहिजे. बचत करण्याची सवय देशांत जर खोल रुजवावयाची असेल तर ती अगदीं लहान वयापासून लावण्याची दक्षता घेतली पाहिजे. बचत करण्याच्या सवयीचें फल दिसूं लागण्यास ५० वर्षांचा कालावधि लागणें सुद्धां शक्य आहे. एवढा अवधि गेल्यावर ही सवय म्हणजे राष्ट्राच्या शक्तीचा एक मोठा झरा आहे असें दिसून येईल. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत २४५ कोटी रुपये बचतीच्या साह्यानें गोळा करण्याचें ठरविण्यांत आलें होतें; पण प्रत्यक्ष मात्र सुमारें २०० कोटी रुपयांची रक्कम गोळा होईल असें वाटतें.

### छापखान्यांतील कामगारांना किमान वेतन

छापखान्याच्या धंद्यांतील कामगारांचें किमान वेतन सरकार ठरवून दिलें आहे. १८ जानेवारी, १९५६ च्या गॅझेटांत ह्या वेतनाचे दर प्रसिद्ध झाले असून, ते १ मे, १९५६ पासू अंमलांत येतील.

### चित्रपटांची तपासणी

सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉर्सनीं १९५५ मध्यें एकूण ३०७४ चित्रपट तपासले.

**कारखाने चालविण्यासाठीं कॉर्पोरेशन्स—** सिलोनच्या सरकारनें प्लायवुड, कातडीं व कॉस्टिक सोडा हे तीन कारखाने चालविण्यासाठीं स्वतंत्र कॉर्पोरेशन्सची स्थापना केली आहे. कारखान्यांचा कारभार अधिक कार्यक्षमतेनें चालविता यावा म्हणून ही व्यवस्था करण्यांत आली आहे. सोड्याच्या कारखान्यांत १ कोटी रुपयांचें भांडवल गुंतलें आहे.

**बडोदा म्युनिसिपालिटीला कर्ज—** बडोदा शहरांतील सांडपाण्याचा उपयोग करून घेण्याची योजना आखण्यांत आली आहे. ह्या कामासाठीं मुंबई सरकारनें म्युनिसिपालिटीला २,८५,००० रुपयांचें कर्ज मंजुर केलें आहे. कर्जाची फेड १५ वार्षिक हप्त्यांनीं करावयाची आहे. व्याजाचा दर ४। टक्के आहे.

**सौराष्ट्रांत दोन नवीन कॉलेजें—** येत्या जूनपासून सौराष्ट्र सरकार दोन नवीं आर्टस् कॉलेजें काढणार आहे. त्यांपैकी एक भावनगर येथें आणि दुसरें सुरेंद्रनगर येथें काढण्यांत येणार आहे सुरेंद्रनगर येथील कॉलेजांत सायन्सचेहि वर्ग काढण्यांत येतील. दोन्ही कॉलेजें गुजरात विद्यापीठाला जोडण्यांत येतील.

**पेरांबूर येथील कारखाना—** पेरांबूर येथील रेल्वेचे डबे तयार करण्याच्या कारखान्यांत तयार झालेले पहिले ७ डबे नुकतेच रेल्वेला देण्यांत आले. हा कारखाना स्विस तांत्रिक मदतीनें काढण्यांत आलेला असून त्यामध्यें दरसाल ३५० डबे तयार करण्यांत यावयाचे आहेत. इतके डबे वर्षापेक्षा कमी कालांतहि तयार होऊं शकतील असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे.

**रबराचें विमान—**अमेरिकेंतील गुडइअर एअरक्रॅफ्ट कॉर्पोरेशननें तयार केलेल्या रबराच्या विमानानें आपलें पहिलें उड्डाण यशस्वी रीत्या करून दाखविलें. हें विमान मोटारीमधील ट्रंकेंत मावूं शकतें. मोटारीचा टायर हवा भरून फुगविण्यास जितका त्रास पडतो तितकाच विमान फुगविण्यास पडतो.

**सिमेंट कारखान्याची यंत्रसामुग्री —**झेकोस्लोव्हाकिआकडून भारताला एक संपूर्ण सिमेंटचा कारखाना मिळणार आहे. हा कारखाना आसाममध्यें काढण्यांत यावयाचा असून त्यांत रोज ४०० टन सिमेंट तयार होईल. कारखान्याच्या दुरुस्तीसाठीं एक वर्कशॉपहि पुरविण्यांत येणार आहे.

तमाम दंतरोगांवर
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.